

क्रांतीज्योती
सावित्रीबाई फुले
यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ३ जानेवारी २०२४ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ८५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## सुनील केदार यांची हायकोर्टात धाव



**नागपूर :** नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १५३ कोटी रुपयांच्या घोटाळ्यात माजी मंत्री सुनील केदार यांना अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाचे पाच वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन फेटाळल्यावर आता त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांनी सुरुवातीला सत्र न्यायालयात जामिनासाठी तसेच शिक्षा रद्द करण्यासाठी धाव घेतली होती. मात्र, या घोटाळ्याची व्याप्ती मोठी आहे. रिझर्व्ह बँक, नाबार्डचे अहवाल या खटल्यांमध्ये दाखले करण्यात आले आहेत. या घोटाळ्याने शेतकरी व गुंतवणूकदारांना मोठे नुकसान झाले असून, जामीन मिळाल्यास समाजात चुकीचा संदेश जाईल, असे नमूद करीत जामीनअर्ज स्थगिती देण्याचा अर्ज फेटाळला होता.

ठरलं... जमलं... बस्तान बसवलं!

# ‘अबकी बार ४०० पार, तिसरी बार मोदी सरकार’

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रणनीती आखण्यात एक पाऊल पुढे टाकले आहे. भाजपला पर्याय म्हणून विरोधकांनी उभ्या केलेल्या इंडिया या आघाडीत अजूनही सामसूम दिसत असताना भाजपने प्लनिंगमध्ये भरारी घेतली आहे. मंगळवारी दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत निवडणुकीचे घोषवाक्य ठरवण्यात आले तसेच एनडीएमध्ये मित्रपक्ष वाढवण्यासाठी एक समितीदेखील गठीत करण्यात आली. ‘अबकी बार ४०० पार,तिसरी बार मोदी सरकार’ हे पक्षाचे घोषवाक्य असणार आहे.**

देशात लोकसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले असून मार्च महिन्यात लोकसभा निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, सर्वच राजकीय पक्ष, आघाड्या, युती आणि अपक्षही कामाला लागले आहेत. या निवडणुकीत विजय मिळवून सलग तिसऱ्यांदा देशाची सत्ता मिळवण्यासाठी भाजपाने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यासाठी पक्षाच्या मुख्यालयामध्ये एक उच्चस्तरीय बैठक झाली. त्यामध्ये, भाजपाच्या यंदाच्या निवडणुकीतील प्रचाराचे घोषवाक्य ठरले.

२२ जानेवारी रोजी अयोध्येमध्ये राम मंदिरामध्ये प्राणप्रतिष्ठापना सोहळा होणार आहे. या सोहळ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अनेक राज्यांमध्ये झंझावाती सभा होतील. याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या देशव्यापी दौऱ्यांबाबतही चर्चा करण्यात आली. याच बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकांसाठी भाजपाच्या प्रचाराची दिशा आणि घोषवाक्यही ठरवण्यात आले. ‘अबकी बार ४०० पार, तीसरी बार मोदी सरकार’ हे घोषवाक्य या निवडणुकीत असणार आहेत. भाजपाने यापूर्वीच्या निवडणुकांमध्येही घोषवाक्यांवर मोठा भर दिला होता.

सन २०१४ च्या निवडणुकीत भाजपाने, ‘बहुत हो गई महंगाई की मार, अब की बार मोदी सरकार’ हे घोषवाक्य दिले होते. तर, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ‘फिर एक बार मोदी सरकार’ हे घोषवाक्य घेऊन प्रचाराची रणनिती आखली होती. आता, मोदींच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा होत असलेल्या लोकसभा निवडणुकांसाठी भाजपाने आपले घोषवाक्य निश्चित केले आहे. ‘अबकी बार ४०० पार, तिसरी बार मोदी सरकार’, हे घोषवाक्य निश्चित केले आहे. त्यामुळे, भाजपाकडून एकप्रकारे प्रचाराचा नारळ फुटला आहे, प्रचाराचा शुभारंभ झालाय, असेच म्हणावे लागेल. दरम्यान, भाजपाच्या या बैठकीतून मिळालेल्या माहितीनुसार, इतर पक्षातील नेत्यांना पक्षात घेण्याबाबत विचार करण्यासाठी भाजपाने जॉयनिंग समितीची स्थापना केली आहे. ही समिती ज्या नेत्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करेल, त्यांनाच भाजपामध्ये प्रवेश दिला जाणार आहे. पार्टी मुख्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा यांच्यासह देशभरातील सुमारे १५० नेते सहभागी झाले.

### असे नेते नकोच! फिल्टर लागणार

लोकसभा निवडणुकीआधी भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरू होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपने एक समिती स्थापन केली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला यश मिळेल. बहुमतासह सत्ता राखण्यास मोदी यशस्वी ठरतील, असे सर्व्हे सांगतात. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये जोरदार इनकमिंग होण्याची शक्यता आहे. पक्ष प्रवेशाशी संपर्क करणाऱ्या नेत्यांसाठी भाजप आता फिल्टर लावणार आहे. अन्य पक्षातील नेत्याला प्रवेश देण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय ही समिती घेईल.



### झंझावाती सभा-खास रणनीती

पक्षाच्या मुख्यालयातील बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यांचे नियोजन करण्यात आले.अयोध्येतील सोहळ्यानंतर मोदींच्या अनेक राज्यांमध्ये झंझावाती सभा होतील. याशिवाय शाह आणि नड्डा यांच्या देशव्यापी दौऱ्यांबाबतही चर्चा करण्यात आली.इतर पक्षातील नेत्यांना पक्षात घेण्याबाबत विचार करण्यासाठी भाजपाने जॉयनिंग समितीची स्थापना केली आहे. ही समिती ज्या नेत्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करेल, त्यांनाच भाजपामध्ये प्रवेश दिला जाणार आहे.

---

नववर्षाच्या पहिल्या दिनी

## तुळजाभवानीच्या चरणी २८ लाखांची रोकड

**धाराशिव :** नववर्षाच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या उत्पन्नात घसघशीत भर पडली आहे. सोमवारी दिवसभरात भाविकांनी मोठ्या श्रद्धेने देवीचारणी तब्बल २८ लाखांची रोकड, १८ तोळे सोने आणि दोन किलो चांदी अर्पण केली आहे.

दोन दिवसात पन्नास हजाराहून अधिक भाविकांनी जगदंबेचे दर्शन घेतले. तुळजाभवानी मंदिरात वर्षभर अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यात शारदीय आणि शाकंभरी नवरात्र महोत्सवासह, गुढीपाडवा, ललितपंचमी, अक्षयतृतीया, रामनवमी, होळी, रंगपंचमी, भेंडोळी अशा महत्वपूर्ण धार्मिक कार्यक्रमांसह अनेक विधी व कुलाचार पार पाडतात. मराठी महिन्याच्या दिनदर्शिकेनुसार या सर्व कार्यक्रमांचे वेळापत्रक मंदिर समितीच्या वतीने जाहीर केले जाते. मात्र अलीकडच्या काही वर्षांपासून नाताळाच्या आणि नवीन वर्षाच्या सुट्ट्यांमध्ये देवी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता मंदिराचे दरवाजे २२ तास खुले ठेवण्याचा निर्णयही मंदिर संस्थानच्या वतीने घेण्यात आला. दिवसाचे २२ तास मंदिर खुले राहिल्याने भाविकांना दर्शनासाठी मोठा वेळ उपलब्ध झाला. परिणामी दरवर्षी नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर तुळजाभवानी देवीचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढताना दिसत आहे. त्यामुळे देवीच्या उत्पन्नातही घसघशीत भर पडत आहे.



## राज्यात लोकसभेच्या ६ जागा लढवणार : शेट्टी

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्राच्या राजकारणात अडगळीत पडलेले स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांना आपले राजकीय बस्तान बसवण्यासाठी आटापिटा करावा लागत आहे. त्यांना एकही राजकीय पक्ष जवळ करेना. त्यामुळे आशा सुटेना, देव भेटेना अशी केविलवाणी अवस्था त्यांची झाली आहे.

आमची संघटना राज्यातील लोकसभेच्या सहा जागा लढवणार असल्याचे शेट्टी यांनी मंगळवारी मुंबईत पत्रकारांशी बोलताना सांगितले. हातकणंगले, माढ्यासह सहा जागा लढवणार लढवणार असून महाविकास आघाडीसोबत न जाण्याचा सध्या तरी निर्णय असल्याचेही त्यांनी सांगितले.




हातकणंगले या लोकसभा मतदारसंघात राजू शेट्टी स्वतः निवडणूक लढवणार आहेत. तर रवीकांत तुपकर यांनी बुलढाण्यातून निवडणूक लढवण्याचे घोषित केले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मंगळवारी शेट्टी यांनी भेट घेतली. शेतकरी प्रश्नावर ही भेट असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात जोपर्यंत महाविकास आघाडीकडून काही गोष्टींचे स्पष्टीकरण मिळत नाही तोपर्यंत कुठलाही विचार करणार नसल्याचे त्यांनी सांगितले. या शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा मिळावा, शिवसेनेचा पाठिंबा मिळावा यामुळे आम्ही उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आणि शेतकऱ्यांच्या लढ्यामध्ये आम्ही नेहमी तुमच्यासोबत राहू असं आम्हाला ठाकरेंनी आश्वासन दिले आहे, असेही ते म्हणाले.

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा कोणत्या जागांवर दावा

१) हातकणंगले, २) कोल्हापूर, ३) सांगली, ४) माढा, ५) परभणी, ६) बुलढाणा

## मोहोळ तालुक्यात कोरोनाचा शिरकाव; चौघांना बाधा

सुराज्य/मोहोळ



भल्या भल्यांची भांबेरी उडवणाऱ्या कोरोना ने आता मोहोळ तालुक्यात शिरकाव केला असून, या सदृश्य आजाराचे मोहोळ तालुक्यात चार रुग्ण सापडले आहेत. चार रूग्णा पैकी तिघांना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात चाचणी साठी दाखल केले आहे, तर एकाला घरीच क्वारंटाईन केले असल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ अरुण पात्रुडकर यांनी दिली.

कोरोना सदृश्य आजाराने पुन्हा डोके वर काढले आहे. कोरोना आता गेला अशा अविर्भावात नागरिकांनी कोरोना चे नियम पाळणे बंद केले आहेत. विवाह सोहळे, राजकीय कार्यक्रम, शेतकरी मेळावे या सह अन्य ठिकाणी गर्दी वाढत आहे. सध्या वातावरण बदल होत असल्याने आजार बळावत आहेत.

## खानापूर येथे दागिन्याची चोरी

**चक्कलकोट :** तालुक्यातील खानापूर येथे तीन दिवसांपूर्वी झालेल्या घरफोडी प्रकरणात पोलिसांनी दोघा जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

भादुर्या जनबसप्पा बिराजदार आणि निलेश विठ्ठल भिसे (दोघे रा.खानापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशायिताची नावे आहेत. यासंदर्भात कल्लप्पा धोंडप्पा बसरगी (रा. खानापूर) यांनी अक्कलकोट दक्षिण पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. २७ डिसेंबर रोजी त्यांच्या बंद घराचा दरवाजा उचकटून चोरट्याने ३६ ग्रॅम सोन्याचे आणि चांदीचे दागिने पळविले होते. ही चोरी दोघांनी मिळून केल्याची फिर्याद कल्लप्पा बसरगी यांनी पोलिसात दाखल केली. हवालदार मियावाले पुढील तपास करीत आहेत.

## पेट्रोल भरण्यासाठी जाताना अपघात; दुचाकीस्वार ठार

सुराज्य/सोलापूर

शहरातील बऱ्याच पेट्रोल पंपावर इंधन संपल्याचे पाहून हैदराबाद रोडवर पेट्रोल भरण्यासाठी जाताना दुचाकी नाल्यात कोसळल्याने ४१ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात हैदराबाद रोडवरील मुळेगाव तांडा येथे सोमवारी घडला.


शिवशंकर नागनाथ मरगल (वय ४१ रा. सग्गमनगर, जुना विडी घरकुल) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. काल रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास ते मित्रासोबत दुचाकी वरून हैदराबाद मार्गावरील सोन्या मारुती पंप येथे इंधन भरण्यासाठी निघाले होते. मुळेगाव तांडया जवळ ताबा सुटल्याने दुचाकी नाल्यात कोसळल्याने दोघे जखमी झाले. त्यापैकी शिवशंकर यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. मयत शिवशंकर मरगल हे किराणा व्यवसाय करतात. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुली आणि १ मुलगा असा परिवार आहे. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली. इंधन वाहतूक करणाऱ्या टँकर चालकांनी संप पुकारल्याने बातमी पसरताच सोमवारी दिवसभर पेट्रोल पंपावर वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. तर काही पंपावर इंधन संपले होते. पेट्रोल भरण्यासाठी शिवशंकर हे जात असताना हा अपघात घडला.



---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




नशीब पेट्रोल साठवायला ड्रम आणले नाहीत !

| कल्याण |
| --- |
| 169-60-280 |

| मुंबई |
| --- |
| 279-85-159 |

# इंधनाचा तुटवडा भासणार नाही : सरडे

सुराज्य/सोलापूर

**टँकर वाहनचालकांनी पुकारलेल्या संपामुळे सोलापूर शहर-जिल्ह्यातही इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.दरम्यान अफवांवर विश्वास ठेवू नये.इंधनाची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली आहे.**

रस्ते अपघाताबाबत सरकारच्या नवीन वाहन कायद्याच्या निषेधार्थ नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथील वाहन चालकांनी तीन दिवसीय संप पुकारला आहे. यामध्ये मनमाडच्या पेट्रोलियम प्रकल्पातील इंधन वाहतूक करणाऱ्या टँकर चालकांनीही संपात सहभाग घेतल्याने मनमाड जवळच्या हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम आणि इंडियन ऑइल या इंधन प्रकल्पातून होणारा पुरवठा ठप्प होणार आहे.

परिणामी सरकारने अपघाताबाबत केलेल्या कायद्यामध्ये दहा वर्षांची शिक्षा आणि सात लाख दंड प्रस्तावित करण्यात आला आहे. त्याविरोधात चालकांमध्ये तीव्र भावना उमटल्या असून, त्याविरोधात चालकांनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. याचाच परिणाम मंगळवारी सोलापूर शहर-जिल्ह्यातील पेट्रोल पंपावरही झाला असून, बुधवारी पेट्रोल मिळते का नाही? म्हणून नागरिकांनी पंपावर लांबलचक रांगा लावल्या होत्या. आता हा संप किती दिवस चालणार? या भीतीपोटी अनेक दुचाकिस्वार आणि चारचाकी वाहनधारकांनी आपल्या टाक्या फुल्ल करून ठेवल्या आहेत. कारण हा संप मिटल्यावरच सोलापूरकरांना पेट्रोल-डिझेल मिळणार आहे.



### नागरिकांची गैरसोय होवू देणार नाही : सरडे

सोलापूर शहरात दुपारनंतरच पेट्रोल, डिझेलबाबत अफवा पसरल्या आणि रात्री उशिरापर्यंत पेट्रोल पंपावर वाहनधारकांची इंधन भरण्यासाठी मोठी गर्दी दिसून आली. यामुळे सकाळी मी माझ्या सहकाऱ्यांना घेवून पोलीस बंदोबस्तात पेट्रोल कंपन्यांतून टँकर भरून देणार आहोत. तेल कंपन्यांनाही नागरिकांची गैरसोय होवू देवू नये म्हणून सूचना करणार आहोत. यामुळे केवळ अफवांवर विश्वास ठेवून पंपावर गर्दी करू नये. सर्वांना पुरेसे इंधन होणार आहे, कोठेही तुटवडा जाणवणार नाही.

**– संतोष सरडे,**
जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर.

## टायर फुटल्याने दोघे जखमी

सुराज्य/सोलापूर

अर्जुनसोंड (ता.मोहोळ) येथील चौकाजवळ दुचाकीचा टायर पंक्चर होऊन खाली कोसळल्याने मनोज पांडुरंग कांबळे (वय १९) आणि त्याची आई राधिका कांबळे (वय ४५ दोघे रा.पंढरपूर) जखमी झाले.

हा अपघात मंगळवारी सकाळच्या सुमारास घडला. ते दोघे दुचाकीवरून पंढरपूर ते सोलापूरच्या दिशेने निघाले होते. अर्जुनसोंड येथे अपघात घडला. त्यांना सावळेश्वर टोलनाका कर्मचाऱ्यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात या अपघाताची नोंद झाली आहे.